महाराष्ट्र राज्यातील तयार करण्यात आलेल्या लोक जैवविविधता नोंदवहयांची गुणवत्ता तपासणी करण्याकरिता राज्यस्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करणे.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एस-३०/०८.१९/प्र.क्र.२५८/फ-१
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक:- ०५ एप्रिल, २०२१

**प्रस्तावना :-**

मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांचे ओरीजनल ॲप्लीकेशन क्र. ३४७/२०१६ मध्ये दिनांक १८.०३.२०२० रोजीचे पारित आदेशानुसार तयार होत असलेल्या लोक जैवविविधता नोंदवहीची गुणवत्ता उत्तम दर्जाची राहील व त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्यस्तरावर सनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी असे निदेश दिले आहे. या अनुषंगाने राज्यात तयार करण्यात आलेल्या लोक जैवविविधता नोंदवहयांची गुणवत्ता तपासण्यासाठी राज्यस्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यात तयार करण्यात आलेल्या लोक जैवविविधता नोंदवहयांची गुणवत्ता तपासण्यासाठी विषय तज्ज्ञांना समाविष्ट करून खालीलप्रमाणे राज्यस्तरीय सनियंत्रण समिती स्थापन करण्यात येत आहे -:

| अ.क्र. | पदनाम/संस्था | अध्यक्ष/सदस्य |
|---|---|---|
| १ | प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, पशुसंवर्धन विभाग | सदस्य |
| ३ | आयुक्त, मत्स्य व्यवसाय विभाग | सदस्य |
| ४ | आयुक्त, कृषी विभाग | सदस्य |
| ५ | बीएआयएफ, पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई | सदस्य |
| ७ | श्रीमती. अपर्णा वाटवे, वनस्पती तज्ज्ञ, पुणे | सदस्य |

वरीलप्रमाणे गठित राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील -:

१. योग्य कार्यप्रणालीचा अवलंब करुन, तयार करण्यात आलेल्या लोक जैवविविधता नोंदवहयांच्या दर्ज्याचा आढावा घेण्यासाठी नमुना तपासणी करणे.

२. लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्याच्या कामात सहभागी असणाऱ्या विविध घटकांशी संवाद साधणे.

३. दर तीमाहीला (Quarterly) नोंदवही तपासणी बाबतचा अहवाल महाराष्ट्र राज्य जैवविविधता

लोक जैवविविधता नोंदवहयांचे मूल्यांकन करण्यासाठी राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरण, चेन्नई यांचे अर्धशासकीय पत्र क्र. एनबीए/५/३०/२१९/एसबीबी/एनजीटी/ दि.३०.०३.२०२० अन्वये परिशिष्ट-४ मध्ये नमूद मापदंडानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. सदर समिती मधील अशासकीय सदस्य यांना रुपये ८९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणा-या शासकीय कर्मचा-यांच्या दराने प्रवासभता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकुलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०४०५१७४५२७७७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

GAJENDRA PRAKASH NARWANE

Digitally signed by GAJENDRA PRAKASH NARWANE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=08b951d00d8e627aa58c9ab088add1677b8ac27d637c5cdf80b730f756dce9e6, cn=GAJENDRA PRAKASH NARWANE
Date: 2021.04.05 17:50:33 +05'30'

( गजेंद्र नरवणे )
उप सचिव (वने),
महसूल व वन विभाग.

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (वने), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (वने), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, पदुम व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई.
११.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व,नागपूर
१२.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
१३.सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
१४.मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर
१५.वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर
१६.वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगांव-नागझिरा व बोर व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
१७.वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली
१८. सर्व समिती सदस्य
१९.फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई /निवड नस्ती.